N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** गंगापूर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0430 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):** 01/09/2026 22:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिंनाक पासून):** 01/09/2026

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिंनाक पर्यंत):** 01/09/2026

**Time From (वेळेपासून):** 16:08 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 01/09/2026 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 025

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 01/09/2026 22:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पश्चिम, 02 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** बसस्थानक गंगापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** प्रतिभा गोरख आबुज पोनि

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1989

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,छत्रपती संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबधक विभाग, ,छत्रपती संभाजीनगर,छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9637774599

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भारत यशवंत राऊत | | | 1. समर्थनगर, गंगापुर,,गंगापूर, छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण), महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11.**Inquest Report / U.D. case No., If any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दि. 01/09/2026

मी प्रतिभा गोरख आबुज, वय 37 वर्ष, व्यवसाय नोकरी, पद- पोलीस निरीक्षक, नेमणुक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर, मो.नं. 9637774599

मी वरील प्रमाणे असुन, दि.24/08/2026 रोजी मा.पोलीस अधीक्षक ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी आम्हास तक्रारदार श्री. अन्वर शेख बशीर, वय 45 वर्ष, व्यवसाय पत्रकार, रा.रेहाना कॉलनी, गंगापुर, ता.गंगापुर, जि.छत्रपती संभाजीनगर यांचा मोबाईल नंबर 9763424024 हा दिला व त्यांच्या तक्रारी प्रमाणे पुढील कारवाई करण्याचे तोंडी आदेशीत केले. त्याप्रमाणे आम्ही तक्रारदार यांचेशी संपर्क करुन त्यांची तक्रार ऐकुन घेतली. तसेच तक्रारदार यांनी सांगितले की, मी आपणास फोन केल्यानंतर आपण गंगापुर येथे यावे असे सांगितल्याने आम्ही दिंनाक 24/08/2026 रोजी दोन पंचाची सेवा उपलब्ध करुन घेतली. त्यानंतर दिंनाक 27/08/2026 रोजी तक्रारदार यांनी फोनद्वारे कळविले की, आज आपण गंगापुर येथे यावे असे सांगितले वरुन आम्ही सापळा पथक व पंच असे गंगापुर येथे जाण्याकरीता रवाना झालो. गंगापुर येथे गेल्यानंतर तेथे तक्रारदार यांची भेट घेवून त्यांना सापळा पथक व पंचांची ओळख करुन दिली. तसेच पंचांना देखील तक्रारदार यांची ओळख करुन दिली. त्यानंतर तक्रारदार यांनी त्यांची तक्रार सांगितले. सदरची तक्रार मी दोन पंचासमक्ष ऐकुन घेतली व तक्रारदार यांनी त्यांचेकडे होत असलेल्या लाच मागणीची लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे- मी अन्वर शेख बशीर, वय 45 वर्ष, व्यवसाय पत्रकार, रा.रेहाना कॉलनी, गंगापुर, ता.गंगापुर, जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9763424024

मी वरील प्रमाणे असुन, बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्थेचा सदस्य म्हणून काम करतो. माझी पत्नी, मुलगी व दोन बहीणी यांचे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे महिंलासाठी प्रवास भाडे सवलतीचे एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढणेकरीता. मी एस.टी.बसस्टँड गंगापुर, येथे जाऊन तिथे चौकशी केली असता तेथील एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणारे एजंट श्री. भारत राऊत यांनी मला एका एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्डसाठी 250/- रुपये प्रमाणे पैसे द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा त्यांना मी शासनाचे नियमाप्रमाणे एका कार्डसाठी 199/- रुपये शुल्क आहे असे बोललो व मला चार महिंलाचे कार्ड काढायचे आहे असे बोललो असता, त्यांनी मला एका स्मार्ट कार्डसाठी 250/- रुपयेच द्यावे लागतील असे सांगितले. तेव्हा ते एक एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणेकरीता शासकीय शुल्का व्यतिरीक्त प्रति कार्ड 51/- रुपये लाच घेत असल्याचे माझ्या निंदशनास आले. मला त्यांना माझ्या घरचे चार महिंलाचे एन.सी.एम.सी. कार्ड काढण्यासाठी प्रति कार्ड 51/- रुपये प्रमाणे असे चार महिंलाचे 204/- रुपये लाच देण्याची इच्छा नसल्याने मी पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे तक्रार देण्यासाठी दिंनाक 24/08/2026 संपर्क केला. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्रीमती प्रतिभा आबुज, यांचा फोन आला त्यांना मी माझ्याकडे होत असलेल्या लाच संबंधी माहिती दिली. तसेच मी आपणास फोन केल्यानंतर आपण यावे असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना दिंनाक 27/08/2026 रोजी फोन करुन आपण आज गंगापुर येथे या असे सांगितले.

त्यावरुन लाचलुचपत प्रतिंबधक कार्यालयाच्या पोनि आबुज मॅडम हया त्यांचे पोलीस पथक व पंचासह दिंनाक 27/08/2026 रोजी गंगापुर येथे आले. मी त्यांचेकडे माझ्या वरील घटनेची लेखी तक्रार देत आहे. माझा व एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणाऱ्या एजंट यांचेसोबत पैशाचा देण्याघेण्याचा व्यवहार नाही किंवा वैर दुश्मनी नाही. मी आज रोजी एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणाऱ्या एजंटला भेटण्यास जाणार आहे. त्यांनी मला माझी पत्नी, मुलगी व दोन बहिणी असे एकुण चार महिला सदस्य यांचे एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढून देणेकरीता प्रति कार्ड शासकीय शुल्क 199/- रुपये व्यतिरीक्त अधिकचे पैसे मागितल्यास त्यांचेवर योग्य कारदेशीर कारवाई करावी हि विंनती आहे. अशा मजकुराची लेखी तक्रार दिली.

तक्रारदार यांनी दिलेल्या वरील तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारीतील अभिकथीत लोकसेवक एन.सी.एम.सी. कार्ड



Scanned with OKEN Scanner

काढून देणार एजंट श्री. भारत राऊत यांची लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी आम्ही तक्रारदार, दोन्ही पंच, व सापळा पथकातील सदस्य यांना लाचमागणी पडताळणीच्या अनुषंगाने प्रक्रिया सांगुन, सुचना दिल्या. त्यानंतर दोन्ही पंचासमक्ष व्हाईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन, व्हाईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांचे अंगावर लपवुन दिला. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 आकाश हिवराळे यांना अभिकथीत लोकसेवक एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणार एजंट श्री. भारत राऊत यांच्या लाचमागणी पडताळणीसाठी बसस्टॅण्ड गंगापुर येथे तक्रारदार यांचेकडील मोटार सायकलने दि.27/08/2026 रोजी 15.30 वा.सुरक्षित ठिकाणाहुन रवाना केले. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.1 हे लाचमागणी पडताळणीहून 15.58 वा.सुरक्षित ठिकाणी परत आले. त्यावेळी तक्रारदार यांचेकडील व्हाईस रेकॉर्डर काढुन बंद केला. व पंच क्र.1 आकाश हिवराळे यांना सुरक्षित ठिकाणाहुन गेल्यापासुन परत येई पर्यंत काय घडले याची विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणार एजंट श्री. भारत राऊत यांनी तक्रारदार यांना एक एन.सी.एम.सी.स्मार्ट कार्ड काढून देणेकरीता 250/- रुपयेची मागणी केली. त्यावेळी तक्रारदार म्हणाले की, आमच्या घरामध्ये पाच जण किंवा चार जण आहेत सध्याला मग, असे म्हणल्यानंतर एजंट श्री. भारत राऊत म्हणाले की, अडीचशेच आहे. बाहेर तीनशे रुपये चालु आहे चौकात तीनशे असे म्हणाले, त्यानंतर तक्रारदार म्हणाले की, चार जनाचें किती होतील. त्यावर एजंट श्री. भारत राऊत म्हणाले तेवढेच होतील, बाहेर चौकात तीनशे चालु आहे . त्यानंतर तक्रारदार म्हणले की, किती द्यावे लागतील तुम्हाला, त्यावर एजंट श्री.भारत राऊत म्हणाले की, एक हजार रुपये होतील, त्यावर तक्रारदार म्हणाले चार जनांचे त्यानंतर एजंट श्री. भारत राऊत म्हणाले हां, असे म्हणाले, त्यानंतर तक्रारदार म्हणाले नाव सांगाना, त्यावर एजंट भारत राऊत म्हणाले राऊत, त्यावर तक्राराारदार म्हणाले राऊत, त्यावर एजंट भारत राऊत म्हणाले हो भारत राऊत, त्यानंतर मी व तक्रारदार परत आलो असे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांना विचारणा केली असता त्यांनी पंच क्र.1 यांचे प्रमाणे हकीकत सांगितली.

त्यानंतर तक्रारदार व दोन्ही पंच यांचे समक्ष लाचमागणी पडताळणीतील संभाषण ऐकले त्यात तक्रारदार यांना एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणारे एजंट श्री. भारत राऊत यांनी तक्रारदार यांचे परिवारातील चार महिला यांचे एन.सी. एम.सी. कार्ड काढून देणेकरीता 250/- रुपये प्रति कार्ड प्रमाणे एकुण चार कार्डसाठी 1000/- रुपये मागणी केले. म्हणजे एक एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढणेकरीता शासकीय नियमानुसार 199/- रुपये शुल्क प्रमाणे चार महिलांचे एन.सी.एम.सी. कार्ड काढणेकरीता 796/- रुपये शासकीय शुल्क होत असतांना त्याव्यतिरीक्त 204/- रुपये बेकायदेशीरपणे लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे लाचमागणी पडताळणी संभाषणावरुन स्पष्ट झाले. लाचमागणीतील तक्रारदार व एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणारे एजंट श्री. भारत राऊत यांचेतील संभाषणाची स्क्रिप्ट काढुन, पंचासमक्ष सविस्तर लाचमागणी पंचनामा तयार करण्यात आलेला आहे. त्यानंतर तक्रारदार यांना काही कामानिमीत्त बाहेर जाणे असल्याने दि.01/09/2026 रोजी पुढील सापळा कारवाई करण्याची विंनती केली. त्यावरुन सर्वानुमते दि.01/09/2026 रोजी पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरले.

त्यानंतर दि.01/09/2026 रोजी नियोजीत केलेल्या सापळा कारवाईत पंचासमक्ष तक्रारदार अन्वर शेख बशीर, वय 45 वर्ष, व्यवसाय पत्रकार, रा.रेहाना कॉलनी, गंगापुर, ता.गंगापुर, जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 9763424024 यांनी एन.सी.एम.सी.स्मार्ट कार्ड काढून देणारे एजंट अभि.कथीत लोकसेवक श्री. भारत राऊत यांची भेट घेतली व तक्रारदार यांची पत्नी व मुलगी यांचे एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढून देणेबाबत सांगितले असता, अभि.कथित लोकसेवक श्री.भारत राऊत यांनी सदर दोन महिला यांचे एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्डचे रजिस्ट्रेशन केले व त्यांना प्रति कार्ड 199/- रुपयाची ऑनलाईन पावती दिली व शासकीय नियमानुसार प्रति कार्ड 199/- रुपये प्रमाणे दोन कार्डचे 398/- रुपये शासकीय शुल्क असतांना त्याव्यतिरीक्त 102/- रुपये लाचेची रक्कम असे एकुण तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष 500/- रुपये रक्कम बसस्टॅण्ड गंगापुर, येथे एन.सी.एम.सी. कार्ड काढून देणारे कक्षात अभि.कथित लोकसेवक एजंट श्री.भारत राऊत यांनी स्वत: स्विकारली. त्यानंतर तक्रारदार यांनी लाच स्विकारल्याचा पुर्व नियोजीत इशारा केला. त्यावेळी आम्ही व सापळा टीम तात्काळ घटनास्थळी हजर झालो. त्यावेळी एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढून देणारे एजंट श्री. भारत राऊत यांना आमचा परिचय दिला. तसेच त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव भारत यशवंत राऊत वय-35, व्यवसाय- एस.टी.बसस्टॅण्ड एन.सी.एम.सी.स्मार्ट कार्ड काढून देणारे ऑपरेटर राहणार- समर्थनगर, गंगापुर, ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 8956559977 असा सांगितला. त्यानंतर तक्रारदार यांचेकडून स्विकारलेल्या लाचेच्या रकमेबाबत एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढून देणारे ऑपरेटर श्री. भारत राऊत यांना विचारणा केली असता, त्यांनी सदरची रक्कम टेबलवर ठेवले असल्याचे सांगितले. त्यावेळी दोन्ही पंचासमक्ष सदरची लाचेची रक्कम ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही करुन त्याबाबत सविस्तर घटनास्थळ पंचनामा करण्यात आलेला आहे.

तरी आरोपी खाजगी इसम श्री. भारत यशवंत राऊत वय-35, व्यवसाय- एस.टी.बसस्टॅण्ड एन.सी.एम.सी.स्मार्ट



Scanned with OKEN Scanner

.B (एन.सी.आ
अन्वेषण फॉर्म
प्रति



कार्ड काढून देणारे ऑपरेटर राहणार- समर्थनगर, गंगापुर, ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर मो.नं. 8956559977 यांनी तक्रारदार श्री. अन्वर शेख बशीर यांची पत्नी, मुलगी व दोन बहिणी यांचे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळातर्फे महिलांसाठी प्रवास भाडे सवलतीचे एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढून देणेकरीता शासकीय नियमानुसार प्रति कार्ड 199/- रुपये शुल्क असतांना चार कार्डचे 796/- रुपये होत असताना त्याव्यतिरीक्त 204/- रुपये लाचेची मागणी करुन एकुण 1000/- रुपयांची मागणी दिनाक 27/08/2026 रोजी पंचासमक्ष केली होती. परंतू दिनाक 01/09/2026 रोजी सापळा कारवाई दरम्यान तक्रारदार यांच्या दोन बहिणींना काम असल्याने त्यांची पत्नी व मुलगी अशा दोन महिला आल्याने आरोपी खाजगी इसम श्री. भारत यशवंत राऊत यांनी दोन महिला यांचे एन.सी.एम.सी. स्मार्ट कार्ड काढून देणेकरीता अधिकृत शासकीय शुल्क प्रति कार्ड 199/- रुपये असल्याने दोन कार्डचे 398/- रुपयाची अधिकृत ऑनलाईन पावती दिली असतांना यातील आरोपी यांनी अधिकृत एन.सी. एम.सी. स्मार्ट कार्ड वितरण परवानाधारक नामे सोमनाथ सुर्यकांत खंडागळे, राहणार सावखेडा, ता.गंगापुर, जि. छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात ऑपरेटर/व्यवस्थापक म्हणून कार्यरत असतांना स्वत:चा प्रभाव पाडून तक्रारदार यांचेकडून दोन कार्डचे एकुण 500/- रुपये त्यापैकी 102/- रुपये लाच रक्कम दिंनाक 01/09/2026 रोजी 16:08 वा. एस.टी.बस स्टॅण्ड गंगापुर येथे एन.सी.एम.सी. कार्ड काढून देण्यात येणारे कार्यालय येथे पंचासमक्ष स्वत: स्विकारली असता त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. म्हणून माझी आरोपी खाजगी इसम श्री. भारत यशवंत राऊत वय-35, व्यवसाय- एस.टी.बसस्टॅण्ड एन.सी.एम.सी.स्मार्ट कार्ड काढून देणारे ऑपरेटर राहणार- समर्थनगर, गंगापुर, ता.गंगापुर जि.छत्रपती संभाजीनगर यांचे विरुध्द कलम - 7 (अ) भ्रष्टाचार प्रतिंबध अधिनियम 1988 प्रमाणे सरकार तर्फे कायदेशीर फिंयाद आहे.
माझा फिंयादी जबाब माझ्या सांगणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केलेला असुन, तो मी वाचुन पाहीला असता बरोबर व खरा आहे.

फिंयाद दिली सही.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Salim Amar Chaous(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Salim Amar Chaous
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे गंगापूर,
छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Scanned with OKEN Scanner